**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ११६/२०२५ मधील निशाणी ७ वर आदेश**
CNR No.MHAK070010912025
(दिनांक २० मार्च, २०२६)

१. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये कलम २१ नुसार मुलांचा ताबा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथनानुसार अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे लग्न दिनांक ०३.०६.२०२१ रोजी झालेले असुन सदर विवाहासंबंधातून त्यांना एक मुलगा जोहान खान राजिक खान, वय ३ वर्ष व एक मुलगी जन्नत खान राजिक खान, वय ८ महिने अशी अपत्ये आहेत. गैरअर्जदार क्रमांक १ ते ८ अनुक्रमे अर्जदाराचे पती, सासु, सासरा, जेठ, जेठानी, दिर, ननंद आणि नंदोई आहेत. गैरअर्जदार यांनी अर्जदारावर वेळोवेळी कौटूंबिक हिंसाचार करुन उपरोक्त नमुद मुलाला जबरदस्तीने त्यांचे ताब्यात ठेवलेले आहे. गैरअर्जदार क्र. १ हा मिस्तरी कामाचे मोठे ठेके घेत असल्याने तो नेहमीच कामानिमित्त बाहेरगावी असतो. अर्जदाराचा मुलगा – जोहान खान हा ३ वर्षाचा असून त्याला आईचे प्रेमाची व सहवासाची नितांत आवश्यकता आहे. गैरअर्जदार क्र. १ हा भांडखोर प्रवृत्तीचा असुन त्याला दारु पिणे, चोरी करणे, पत्ते खेळणे, गांजा पिणे, हाणामारी करणे अशा वाईट सवयी आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. १ चे बाहेर परस्त्रीसोबत संबंध असुन तो गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. त्यामुळे मुलाच्या भविष्याचे नुकसान होत असुन त्योच जिवाला धोका निर्माण झाला आहे. अर्जदारा हिने मुलाला भेटण्याचा प्रयत्न केला असता गैरअर्जदार तिला भेटु देत नाहीत व फोनवर बोलु देत नाहीत. गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी अर्जदार हिला धमकावतो की, मुलाला घेवुन रेल्वे खाली उडी घेणार, मी व मुलगा मेल्यानंतर अर्जदार हिस पोलीसांचे दणके मिळतील व अर्जदार सरळ होईल. मुलाला गैरअर्जदारसोबत ठेवल्यास कोणत्याही क्षणी अनपेक्षीत घटना घडु शकते. मुलाच्या उज्वल भविष्याचा आणि जिवनाच्या सुरक्षेचा विचार होऊन न्यायाच्या दृष्टीने अर्जदार हिला मुलाचा ताबा देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर गैरअर्जदार यांना संधी देवुन देखील त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द विना जबाबचा आदेश पारित करण्यात आला.

४. अर्जदार यांनी नि.क्र. १५ वर पुरसीस दाखल करुन नि.क्र. ७ वरील अर्जालाच त्यांचा युक्तिवाद समजण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी हजर होऊन देखील त्यांचा जबाब दाखल केलेला नाही. अर्जदाराने प्रस्तुत अर्ज प्रतिज्ञापत्रासह दाखल केलेला आहे. या विरुध्द गैरअर्जदाराने म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे अर्जदाराच्या कथनावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण नाही. अर्जदाराला एक मुलगा व एक मुलगी असुन मुलगा वय वर्ष ३ नामे जोहान खान हा गैरअर्जदाराच्या ताब्यात आहे. वय वर्ष ३ असलेल्या बालकांना वडीलांच्या सहवासा पेक्षा आईच्या सहवासाची जास्त आवश्यकता असते. या वयात बालक भावनिकदृष्टया आईसोबत जोडलेला असतो. गैरअर्जदाराकडे मुलाचा ताबा नाही असे गैरअर्जदाराचे म्हणणे नाही. अर्जातील कथन आणि जोहान खानचे वय पाहता त्याच्या हिताच्या दृष्टीने प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कलम २१ अन्वये न्यायालयाला दिलेल्या अधिकारान्वये मुलाचा अंतरीम ताबा अर्जदाराकडे देणे योग्य होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## : आ दे श :

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा मुलगा – जोहान खान राजिक खान याचा अंतरीम ताबा अर्जदाराला द्यावा.

३. गैरअर्जदार यांनी अर्जदाराचा मुलगा – जोहान खान राजिक खान याचा अंतरीम ताबा न दिल्यास अर्जदाराला योग्य त्या कायद्याखाली मुलाचा ताबा घेण्याची मुभा राहील.

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2026.03.23 11:09:05 +0530

दिनांक : २०.०३.२०२६.
ठिकाणः बाळापूर

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.

<table>
<tr><td colspan="3">I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order.</td></tr>
<tr><td>Name of the Court</td><td>:-</td><td>Smt. D. M. Patil<br>Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur</td></tr>
<tr><td>Name of the Stenographer</td><td>:-</td><td>A.S.Gawali</td></tr>
<tr><td>Date of Decision</td><td>:-</td><td>20/03/2026</td></tr>
<tr><td>Order signed by P.O on</td><td>:-</td><td>20/03/2026</td></tr>
<tr><td>Order uploaded on</td><td>:-</td><td>23/03/2026</td></tr>
</table>